Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX–2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता/टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./२०२६-२७/No. 1 2 6 5 / दि. 14 JUL 2026

# -: परिपत्रक :-

**प्रति,**

**मा.प्राचार्य / संचालक,**

**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

विषय :- **उच्च शिक्षण संचालनालयच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत...**

संदर्भ :- 1. **मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-1/2026/ई/684, दि.13 मे, 2026.**

2. **मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.विससं/उशि/कोवि/आस्था/2026/ई-2842948, दि.15.05.2026**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (इ.१२ वी) चा निकाल जाहीर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, ट्युशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्ययावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे. **तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहिती पुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे.** सूचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सूचना फलक आणि प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. **तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाच्या लेटरहेड वर व प्रवेश माहिती पुस्तिकेची (Prospectus) एक प्रत संलग्नता विभागास तात्काळ जमा करावी.**

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी उपरोक्तची कार्यवाहीआपल्या स्तरावरून तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

# महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर,विद्यानगर, कोल्हापूर 416 004
Website: https://jdhekolhapur.in
फोन क्र.:(0231) 2535400, 2535454 E-mail: jdhekop@gmail.com

**जा.क्र. : विससं/उशि/कोवि/आस्था**/2026/ई- 2842948 दि.15.05.2026

प्रति,

1. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. कुलसचिव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा
3. कुलसचिव, वारणा समुह विद्यापीठ,वारणानगर ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर
4. प्राचार्य,सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये,कोल्हापूर विभाग.

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

संदर्भ:- संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-1/2026/ई./684 दि.13 मे, 2026

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन विषयास अनुसरुन सूचित करण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ (इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ / शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, ट्युशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहिती पुस्तिकात(Prospectus)असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात आले आहेत. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबधित विद्यापीठ व महाविद्यालयाची राहील.

Shivaji University, Kolhapur
Inward No. 6643
Date 10/7/26

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबधित विद्यापीठ आणि महाविद्यालयाची राहील.

तरी सर्व संबंधित कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 15-05-2026
(डॉ. प्रकाश बच्छाव)
विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,
कोल्हापूर

**सोबत :-संदर्भाधिन पत्राची प्रत**

प्रत :-मा.शिक्षण संचालक(उ.शि)महाराष्ट्र राज्य,पुणे-16यांना माहितीस्तव सविनय सादर.

026-0/0 JD(HE)KOP 1/1901720/202

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य


४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई. /684 दि. मे.२०२६ 13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ( इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरु झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्धवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रतः-१. मा.स्वीय सहाय्यक मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई